परिपत्रक - ६०

**सन २०१७-१८ मध्ये सेवकांनी करावयाच्या बदली अर्जाबाबत.**

# रयत शिक्षण संस्था, सातारा

आस्थापना माध्यमिक विभाग

दि. - २८/०२/२०१७

---

**सर्व शाखाप्रमुख,**
**प्राथमिक, माध्यमिक व अध्यापक विद्यालये,**
**रयत शिक्षण संस्था.**

**यांना...**

**विषय - सन २०१७-१८ मध्ये सेवकांनी करावयाच्या बदली अर्जाबाबत...**

संस्थेमध्ये काम करणाऱ्या रयत सेवकांनी आपले बदली अर्ज आमच्याकडील पाठविलेले परिपत्रक क्र.३८ दि.२६/०२/२००९ च्या सोबत जोडलेल्या बदली संकेताप्रमाणे संस्थेच्या विभागीय कार्यालयाकडे वेळेत सादर करावेत.

१. सेवकांनी HRMS मधील नमुन्यातच व शाखाप्रमुखामार्फतच बदली अर्ज करणे आवश्यक आहे.
२. संस्थेत काम करीत असणाऱ्या पती पत्नी सेवकांना त्याच्या एकत्रीकरणासाठी बदलीसाठी अर्ज करावयाचे असतील त्यांनी पत्नीचे मुळचे नाव बदललेले असणे आवश्यक आहे व असे नाव बदललेले सेवकच बदलीस पात्र ठरतील. (पती/पत्नी अन्य संस्थेत नोकरी करीत असतील तर त्या संस्थेचे नाव नमूद करावे.)
३. सेवकांनी बदली अर्जात खालील माहिती नमूद करणे आवश्यक आहे.
   १) सेवकांनी त्यांना बदल्या हव्या असणाऱ्या किमान पाच शाखा नमूद कराव्यात.
   २) बदलीचे कारण स्पष्ट शब्दात नमूद करावे.
   ३) सेवकांनी HRMS मधील नमुन्यातच बदली अर्ज करणे आवश्यक आहे.
४. याशिवाय इतर कोणत्याही मार्गाने आलेल्या अर्जाचा व अपूर्ण/चुकीची माहिती असणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
५. अर्ज करण्याची शेवटची तारीख १५/०३/२०१७ आहे याची नोंद घ्यावी.
६. मुदतीनंतर आलेल्या बदली अर्जाचा तसेच चुकीची माहिती असणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी.

पान नं.२ वर...

७. संस्थेत कार्यरत असणाऱ्या सेवकांना संस्थेमार्फत समजपत्रे किंवा किरकोळ शिक्षा दिली असेल तर शाखाप्रमुखांनी सदरच्या सेवकांची वरील कागदपत्रे स्कॅन करुन सदर कागदपत्राच्या नकला ई-मेलने विभागीय कार्यालयाकडे पाठवाव्यात. सत्य घटना घडलेली असूनसुध्दा जरा एखादा शाखाप्रमुखांनी सदरची माहिती दिली नाही तर संबंधित शाखाप्रमुख शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील, याची नोंद घ्यावी.

८. शाखाप्रमुखांनी सदरचे परिपत्रक आपल्या शाखेतील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावे व ते वाचल्याबद्दल त्यांच्या सह्या घ्याव्यात.

९. सदरचे परिपत्रक (http://www.rayatshikshan.edu) संस्था वेबसाईटवर माहितीसाठी उपलब्ध आहे.

१०. ऑनलाईन अर्ज भरण्याची पध्दत :- सोबत दिलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

११. शिक्षण सेवकांनी बदलीसाठी अर्ज करु नयेत.

(उत्तम आवारी)
**सहसचिव,(माध्य.)**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**सोबत - ऑनलाईन अर्ज भरण्याची पध्दत**

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी ---**

१) मा.सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.
२) ऑडीटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
३) सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था.

## ONLINE बदली अर्ज भरण्यासंबंधी सूचना :-

- बदली अर्ज करण्यापूर्वी HRMS मधील सेवकाची सध्याची शाखा बरोबर असल्याची व इतर माहिती बिनचूक पूर्ण भरलेली असल्याची खात्री करुन खालील पध्दतीने बदली अर्ज करावा. यामध्ये त्रुटी असल्यास मध्यवर्ती कार्यालयाकडे संपर्क करावा.
- HRMS मध्ये शाखेच्या Login ID मधून बदली अर्ज करण्यासाठी Login करा.
- Log in केल्यानंतर खालील पध्दतीने बदली अर्ज भरण्यासाठी Open करा.
  HRMS => Employee Management => Transfers => Application (Clicy करा).
- Transfers Application मध्ये बदली साठी अपेक्षित शाखा देण्यासाठी Choose Perferences मध्ये संबधित शाखेचा Branch Code माहित असल्यास टाकावा अथवा खालील माहिती Select करुन Add Preference या बटनावर क्लिक करावे. या पध्दतीने सेवकांस एक किंवा एकापेक्षा जास्त शाखा Add करता येतील.
- बदली कारण Reason for Transfer मध्ये भरुन Application Date देवून बदली अर्ज Save करावा.
- भरलेला बदली अर्ज तपासून तात्काळ प्रिंट काढावी अन्यथा नंतर प्रिंट काढता येणार नाही.
  (Plrase check your Transfer Application details and click on Confirm. Once the application. Application will be processed only when you confirm. Once the application is confirmed, you cannot edit it.)
- प्रिंट काढलेल्या बदली अर्जावर सेवकांनी स्वतःची सही करुन शाखाप्रमुखांच्या शिफारशीने विभागीय कार्यालयाकडे ई-मेलने (करुन) पाठवावा.

सहसचिव,(माध्य.)
रयत शिक्षण संस्था, सातारा